कि.दि.अर्ज क्र.21 / 2022
नि.क्र. 12

साक्षीदार क्र.1 अर्जदार यांचेकरीता .

1. **उलटतपास गैरअर्जदार तर्फे श्री. एस.एस.देशपांडे वकिल**

माझे पती महेश बिराजदार हे हयात आहेत. रविंद्र हा माझा दिर आहे. मंगल हि माझी सासु आहे. माझे पतीने माझा दिर व सासु यांचेविरुध्द वाटपाचा दावा क्र. 265 / 2021 न्यायालयात दाखल केला होता. ते प्रकरण आपसी तडजोडीने निकाली निघाले होते. पती माझे सोबतच राहतात. सदर जमीनीतुन एक लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळते. माझे पती शेती करतात. आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह या उत्पन्नातुन भागतो. अक्षय अज्ञान हा इयत्ता पहिलीत आहे. तो श्रीकृष्ण विदयालय गुंजोटी येथील शाळेत शिकत आहे. त्याचा वर्षाकाठी दोन तीन हजार रुपयांचा शिक्षणासाठी खर्च होतो. त्याच्या पावत्या दिलेल्या नाहीत. त्याशिवाय आणखीन कशासाठी किती खर्च होतो याच्या पावत्या आकडेवारी मी दिलेली नाही. साठेखत व्यंकट घोडकेसोबत केलेले आहे. आम्ही त्यांची शेतजमीन विकत घेणार आहेत. आम्ही विकत घेणा—या शेतजमीनीच्या चतु:सिमा मला सांगता येत नाही. विकत घेणा—या शेतजमीनीचे व आम्ही विकणा—या शेतजमीनीचे मुल्यांकनपत्र सहा.निबंधक कार्यालयातुन घेतलेले नाही व ते या प्रकरणात दाखल केलेले नाही. आम्ही खरेदी करीत असलेल्या शेतजमीनीचे व विकत असलेल्या शेतजमीनीचे क्षेत्र दोन—दोन एकर आहे. ते दोन्ही मुळ साठेखत दाखल केलेले नाही. आम्हाला आर्थीक चणचण नाही. आमचे घरापासुन विकत असलेली शेतजमीन एक किलोमीटर अंतरावर आहे. चालत जाउन माझे पती ती शेतजमीन कसतात. हे म्हणणे खरे नाही की, चुकीची खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

दिनांक 03 / 2 / 2023

जिल्हा न्यायाधीश,उमरगा

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHOS050003862022/truecopy/order-1.pdf

एमएसीपी क्र.80/2021
नि.क्र. 27

साक्षीदार क्र.1 अर्जदार यांचेकरीता .

1. **उलटतपास गैरअर्जदार क्र.1 व 2 तर्फे श्री. एस.डी.करके वकिल**

गैरअर्जदार क्र.1 व 2 व त्यांचे विधिज्ञ यांना वारंवार पुकारले असता ते गैरहजर राहिले. सबब त्यांचे विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत केला.

2. **उलटतपास गैरअर्जदार क्र.3 तर्फे श्री.मंहिद्रकर वकिलांमार्फत**.

आपघातवेळी लातुर उमरगा रस्त्याचे कामकाज चालु होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे रस्त्याच्या एकाच पदरावर दोनही दिशेने वहातुक सतत चालु होती. माझे पतीला त्या दरम्यान कोरोना आजाराने ग्रस्त होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती रस्त्यावरील वहातुकीकडे लक्ष न देता अचानकपणे रस्त्यावर आल्याने आपघात घडला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना चक्कर येउन ते रस्त्यावर खाली पडले. हे म्हणणे खरे नाही की, टेम्पो चालकाची त्यामध्ये कोणतीही चुक नव्हती. माझे पतीच्या वयाचा पुरावा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. माझे पती कामाला असल्याबाबत व त्यांच्या उत्पन्नाबाबत कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मुनीम होते, त्यांना दरमहा रुपये पस्तीस हजार पगार होता इत्यादी मी जास्तीची नुकसानभरपाई मिळण्यासाठी खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,
सहि

दिनांक 11/1/2023 मेंबर, एमएसीटी,उमरग

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHOS050003862022/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com